# प रि शि ष्टे

१) मातृकी रुक्मिणी स्वयंवर परिशिष्ट

२) वंशावृक्ष परिशिष्ट

३) शब्दकोश, वाक्प्रचार

४) संदर्भ ग्रंथ सूची

.....

मातृकी - रुक्मिणी - स्वयंवर

कांसे पीतांबर कंठी कुंदमाळा :
कांतु शोभे सांवळा : रुक्मिणीचा : ॥ १ ॥
खांदावरि कावडि पडिभरे चालतु :
तो खेळे वनांतु : दतु सए : ॥ २ ॥
गावो द्वारावती गोमतीए प्रांती :
गोदरीये क्रीडती : चक्रपाणी : ॥ ३ ॥
घावो देउनि अवीघे घाली नीज पदी :
खेळे कृपानीधी : रिधपुरीं : ॥ ४ ॥
चांपेगौर कांती चांपयाच्या दृती :
चांपोली साजती : चक्रपाणी : ॥ ५ ॥
छेदुनी दैत्यवन ल्यन कोडी वीरी :
येदुरावो राज्य करी : व्दारकेसी : ॥ ६ ॥
जन्मली लक्षमी भीमकाचां घरीं :
रुक्मिणि कुमरी : भागयवंत : ॥ ७ ॥
जाणौनि कीर्ति दूरी भीमकाची थोरी :
आले पैं नागारी : कौडन्यासी : ॥ ८ ॥
जंबुदीपी रायें वाणिता आदरे :
मुरारी कीन (न्न) रे : वर्णियेला: ॥ ९ ॥
जाली पाठवणी तोखौनि रुक्मिणी :
दीपुसी वोवाळणी : कीन्नरासी : ॥ १० ॥
जाणौनि भीमके रुक्मिणीचा भावो :
वरु कृष्णादेवो : मानीयेला : ॥ ११ ॥
जन्यौनि रुक्मियें वारीला गोपाळु :
वरु सीसुपाळु : मानवीला : ॥ १२ ॥
जाली नीष्टा स्थानी सीणाली रुक्मिणी :
हदइं चक्रपाणी : स्मारीएले : ॥ १३ ॥

जाली अवस्ताभूत भीमकाची बाळा :
वीप्र मूळ गोपाळा : पाठवीला : ॥ १४ ॥
जीतली त्रिशिखारे शोभा अमरावती :
पातला द्वारावती : वीप्रराजु : ॥ १५ ॥
जाला पैं प्रवेसु राऊळी सुदेवासि :
देखीला ह्रसीकेसी : यादवेसी : ॥ १६ ॥
जाली भेटी वीप्रें घातली लोटांगणीं :
वेळोवेळी चरणीं : लागतुसे : ॥ १७ ॥
जाणौनि ततक्षोणीं वीसर्जली स्थानीं :
वीप्र सांघे वीनवणी : रुक्माइची : ॥ १८ ॥
जन्मदान तुज देइन चक्रवर्ती :
राखे शरणागती : जीवीत नाथा : ॥ १९ ॥
जीवपती ब्रीदें पढवीसी जगी :
भेटि देउनि वेगीं : नेई मज : ॥ २० ॥
जाणौनिया देवें भीमकीची अवस्ता :
वेगीं आरुढले रथां : सुदेवेसीं : ॥ २१ ॥
जाणावीति गुप्त बळभद्रा वृत्तांतु :
नीगाला त्वरीत : कृष्णरावो : ॥ २२ ॥
जाले येक पेणें माहेर रिसोरटि :
रामकृष्णां भेटि : प्रेमभावें : ॥ २३ ॥
जानवसा शिशुपाळां माडी । धावळारी :
नृपमेळा नारी : उत्तरला : ॥ २४ ॥
त्यांनी वीप्र पुढां जाणावो रुक्मिणी :
पातला चक्रपाणी : भीमकीये : ॥ २५ ॥
जाली संभ्रमीत हरीखें निर्भर :
वस्त्रें अलंकार : दान वीप्रा : ॥ २६ ॥

[stamp]

जीवदान् त्वां दीधाले वीप्रा मज :
मी नव्हे कही तुज : उतराई : ॥ २७ ॥
जीणावेया वैरी जरासंदु समरी :
वीजें केलें मुरारी : कौडण्यासी : ॥ २८ ॥
झाळकती झालरी झोपावती टकें :
देखोनि मनीं शंके : सिशुपाळु : ॥ २९ ॥
झानानीति जैंगटा घंटा येकीदाटा :
पुढां चाले थाट : कुंजरांचे : ॥ ३० ॥
येतु चक्रपाणी तुरांचां गजरी :
ते निहे अंबरी : उठीताति : ॥ ३१ ॥
येत्रों येक नादें गर्जती अमरे :
तेणें मेरुगीखारे : कांपताती : ॥ ३२ ॥
टाळ घोळ वीणे टमक वाजती :
रथो वारु गालती : पवनवेगी : ॥ ३३ ॥
टाकीलें नगरु तुरांचे गजरु :
पातले जाळीकारु : भीमकाचे : ॥ ३४ ॥
ठीकांचा भद्रीं उभी ठाकौनि रुक्मिणी :
पाहे चक्रपाणी : वल्लभातें : ॥ ३५ ॥
ठीकलग ध्वजु रथु माणीकीं शोभतु :
वीप्र असे दीवीतु : भीमकीयेतें : ॥ ३६ ॥
डोळस सांवळा देखे भीमबाळा :
मेघाडंबरी नीळा : कृष्णरावो : ॥ ३७ ॥
डोळे अश्रुजळी देह न संभाळी :
झोंप तीये वेळी : घालूं पाहे : ॥ ३८ ॥
ढाळे रथ चाले ढळती कनकदंडे :
पालव झळो प्रचंडे : गीर्वताति : ॥ ३९ ॥
ढोल नीसान वाजती काहळा :
म्हणु पाहे सांवळा : कृष्णदेवो : ॥ ४० ॥

नरनारी नगरी पाहाती येकदाटी :
 भीमु आला भेटी : कृष्णाचीये : ॥ ४१ ॥
नानावीधों वस्त्रों भूषणों अनेकें :
 वाइलीं भीमकें : कृष्णराया : ॥ ४२ ॥
स्तवीत भीमके घातले लोटांगणी :
 दीधाली पाठवणी : कृष्णराये : ॥ ४३ ॥
तुरंग गजरथ तुरांचां गजरी :
 जाला अंबिकापुरी : मेलीकारु : ॥ ४४ ॥
थाटे चहुंकडे थोक्ली असोंसे :
 वीणों गुदर दुपे : घालीताति : ॥ ४५ ॥
धीराव्लीं सैन्यें राये मंडळीक :
 वोळगती येक : कृष्णराया : ॥ ४६ ॥
देउनी रुखावत सर्वे सरवीजनी :
 वीप्र रुक्मिणी : पाठवीला : ॥ ४७ ॥
देखौनि प्रस्तुति बोले चक्रपाणी :
 उचीता रुक्मिणी : न चुकेची : ॥ ४८ ॥
धारुणीयां हातु उधवासहीतु:
 उठीले जगन्नाथु : अरोगणे : ॥ ४९ ॥
धान्य पंडुपुत्रा यादव समस्त :
 नीगाले परीवारीत : रामकृष्ण : ॥ ५० ॥
नानवीधों अन्नें वीचीत्रा वोगणी :
 वाटीती सरवीजणी : यादवासी : ॥ ५१ ॥
नाहीं शाखां अंतु पन्हयां कालना :
 अरोगीतो राणा : कैवल्याचा : ॥ ५२ ॥
पाहाती बाळा येकी करीती नींबलोणा :
 जाली अरोगणा : रामकृष्णा : ॥ ५३ ॥
परीयेळ देउनि दीधाली पाठवणी :
 वस्त्रे अलंकार लेणीं : देउनीया : ॥ ५४ ॥

फोडी देउनि येकी देताति वीडीया :
चरणी साकळीया : लागताति : ॥ ५५ ॥
फुले तुरंबीती मोगरी जाइया :
बासींगे नोवरेया : बांधिताति : ॥ ५६ ॥
बाळा प्रौढा मुग्धा पाहाती वेळोवेळी :
नीगालीया राउळा : भीमकाचा : ॥ ५७ ॥
बुध्दिमंत देवो पुसती वीप्रासी :
हरावें रुक्मिणीसि : कवणेपरी : ॥ ५८ ॥
भीमकी येइल यात्रेसी अंबीके :
हरावी कौतुके : देवराया । ॥ ५९ ॥
भीमकी सखीयांते पुसे तुम्ही कुशाळा :
रुपें गुणें सांवळा : सांधा मज : ॥ ६० ॥
गालवल्या बुध्दी नाढवे विचारु :
सर्वांगें सुंदरु : कांतु तुझा : ॥ ६१ ॥
मनें वेधीयेली स्याचेनि भरे :
त्रैलोक्य सुंदरे : सांवळेनि : ॥ ६२ ॥
येदुरावो सरवींजनीं वर्णीला वीशेष :
सर्वांगी सात्वीक : भीमकीये : ॥ ६३ ॥
यादवांचा सखा भक्तांचा कैवारी :
नुपेक्षीसि हे भोरी : असे जीवीं : ॥ ६४ ॥
रुपें गुणें सृष्टी न पवीजे कहीं :
गज पाडु नाही : गोवींदेसी : ॥ ६५ ॥
रात्री जाली देवा मादनेम गेगळी :
वेदध्वनी राउळी : गोवींदाचां ॥ ६६ ॥
लावण्यनीधान कांती इंद्रनीळा :
नेसला सोनसळा : मालगंठी : ॥ ६७ ॥

ललाटी अर्धचंद्र कांती येकावली :

झाळंबुके कपोळीं : दीसताति : ॥ ६८ ॥

वाजीनल्या भेरी नीशान लागले:

रथीं अरूढले : रामकृष्णा : ॥ ६९ ॥

वाणीजतु भाटीं छत्रां येक दाटी :

गीरवे जगजेठी : यादेवसीं : ॥ ७० ॥

सखीयांसी भीमकी नीगाली अंबीके :

देखौनि पारके : व्यग्र जाली : ॥ ७१ ॥

सांवरली सैन्यें देखौनि गोपाळु :

मागध सीशुपाळु : सर्वभावें : ॥ ७२ ॥

सा (बा) डसीं (षीं) पूजाली रुक्मिणी अंबीका :

वेगी येदुटीळका : भेटि करी : ॥ ७३ ॥

खुणा वीप्रु दावी धारुनि रुक्मिणी :

हा देखौ चक्रपाणी : कांतु तुझा : ॥ ७४ ॥

स्वेत वारु रथीं गरूडध्वजी असे:

मेघाडंबर दीसे : कृष्णाराया : ॥ ७५ ॥

सात्वीक दाटले डोळे अश्रुपाती :

दुरुनि श्रीपति : जुहारीले : ॥ ७६ ॥

हस्तीचे भार भोंवले असीवार :

संखनादे अंबर : गर्जतसे : ॥ ७७ ॥

हंसागती देवी चाले ते रुक्मिणी :

पातले तत्क्षोणी : कृष्णारावो :: ॥ ७८ ॥

लीळावसे करु देउनि मुरारी :

रथी वाइली कुमरी : भीमकाची : ॥ ७९ ॥

लागौनि श्रीचरणा देखतां सकळां :

रुक्मिणी गोपाळा : माळ घाली : ॥ ८० ॥

क्षोत्री उठावले हरीली रुक्मिणी :
    घासरे सैनये दोन्ही : भीडीनली : ॥८१॥
क्षिती कापे सुर पाहाती अंबरी :
    जीतीएले वैरी : रामकृष्णी : ॥८२॥
आइकौनि रुक्मीया कोपें धावीनला :
    मग धरनियां बांधाला : ध्वजा स्तंभी ॥८३॥
आलासि रुक्मिणी सोडउं सर्वथा :
    भादरीला माथा : रुक्मीयाचा : ॥८४॥
इक्षितु सर्वज्ञ हांसौनि रुक्मीयां :
    तवं रामु म्हणे मेहुणेया : मानु केला : ॥८५॥
इंद्र चंद्र ब्रमहा मीळौनिया (सुर ) सृष्टी :
    करीती पुष्पवृष्टी : कृष्णावरी : ॥८६॥
उधारीले जीव लीळा परोपरी :
    वैरीया मुक्ति मुरारी : पाववीले : ॥८७॥
उठती नाद अंबरी तुरांचां गजरी :
    बीजें केलें मुरारी : सोरटासि : ॥८८॥
उभवीले डेरे दुसे देवोनिया :
    सोहळा येदुराया : मांडीयेला : ॥८९॥
उत्तम रूपी राये भीमकादि आले :
    व-हाड मांडीलें : आनंदेसी : ॥९०॥
उटीती भीमकीये सुंदरी :
    पांचा कळसींवरी : न्हाणीयेली : ॥९१॥
उधातु क्षीरोदक कांसे वेढीयेला :
    परीवंटीं शोभला : रुक्मिणीचां : ॥९२॥
उदीत कांचोळी लेइली रुक्मिणी :
    ठीकल्ग लेणी : प्रभा फांके : ॥९३॥

उत्तमे कांकणो अंदु पायेवाटे :
तेइले बरवंटें : मीरवताति : ॥ ९४ ॥
उत्कंठी हार अनेक अलंकार :
त्रैलोक्यसुंदर : वेढ्टीयेले : ॥ ९५ ॥
उदारे वागा केला श्रीजगमोहनु :
से (शो) भु नेणो वानं : सहश्र मुखों : ॥ ९६ ॥
उत्कर्षों येऊनि भीगें मंडपासी :
लज्ञ (ग्न) ह्सीकेसीं : लावीयेले : ॥ ९७ ॥
उभ्दवली ध्वनी वेदवाजांत्राची :
वरातु वधुवराची : मीर्वतसे : ॥ ९८ ॥
उन्मत्त मातंगी मीरवो वधुवर :
चालती मोगर : चातुरंगी : ॥ ९९ ॥
उत्तम वरात द्वारकेमाझारी :
वोवाळीती नारी : नागरीक : ॥ १०० ॥
उतरले वधुवर मंडपी वीनोंदे :
वोवाळीला आनंदे : देवकीया : ॥ १०१ ॥
भेटलीं वसुदेवो - देवकी वधुवरां :
आनंद सुरवरां : तीहीं लोकी : ॥ १०२ ॥
टाळघोळ तुरे वाजता सुरवरी :
पुष्पवृष्टी हरी : पूजायेला : ॥ १०३ ॥
चालीले वधुवर पाळउनि लोकां :
येकांती प्रेमसुखा : रुक्मिणीसी : ॥ १०४ ॥
देऊनी आलींगन अनुभवीले सुखा :
रतीचा वीशेषा : तेवी जाणे : ॥ १०५ ॥

वोत्तवर सुख तारुण्याचा भोगु :

जाणे तो श्रीरंगु : सृष्टीमाजी ।   ॥ १०६ ॥

जाले हे संपूर्ण रुक्मिणीस्वैंवर :

मातृकी नागर : वोवीबंधी:   ॥ १०७ ॥

नागदेवाचा स्वामी कृपेचा सागरु :

सेवासर्वस्वरु : सर्वभावी :   ॥ १०८ ॥

वाचीतां आइकतां देवाचे चरीत्रा :


होती प्रेमपात्रा : सु (शु) ध (६द) बुधी (६दी): ॥ १०९ ॥

वाखाणीले गीत महादाइ कींकरीं :

देवा कृपा करी: भक्तिभावे :   ॥ ११० ॥

.......

आद्य कवयित्री महदंबेचा वंशावृक्ष (सुहासिनी इर्लेकर यांच्या महदंबेचे धवळे या ग्रंथाच्या आधारे)



आतुर्य = स्त्री
अदू = चरणालंकार
कांतु = नवरा
अभिशेक = अभिषेक
अवस्वरी = चिंता
अंगवना = सेवा
आक्षोवणी = औक्षवण
आंगवले = सेवक
आडा = टिळा
आरोगण = भोजन, जेवण
लक्षान्ती = चमकती
उपहारिती = अर्पण करणे
उसंगि = मांडीवर
ओळग = सेवा करणे
कडवसी = काटोकाट
कणवळा = प्रेम
कालान = कालवण
काह्याचे = कशाचे
कैळवली = उपवर
गजब = कोलाहल, आरडाओरड
गातेवाते = गाजतवाजत
गुदर = तंबू
गुढी = विजयपताका
गुपत = गुप्त गोष्टी
घाडीए = गुहुर्तावर

ठाणवैया = ठाणाण्या दिवा ठेवण्याची जागा
ताटकाटा = उष्टे खरकटे काणारा
तुरग = घोडा
तोडरु = पायातील तोरडया
तुरे = वाद्य
थाटी = थाटमाट
थोंगी = जनसमुदाय
दळभार = सैन्य
दांडी = पालखी
दुहीता = मुलगी
दुसारा = आत्म विस्मृत
देपांगे = देववस्त्र
धारिया = परिधान केलेले
धुरे = पुढच्या बाजूस
नागारी - स्तुती करणारे
निच = नित्य
निरुता = निश्चितपणे
निशाण = पताका
पडीगे = पिकदाणी
पदाकिशी = गौरव करणे
पदीयार = आवडता
परिपाठ = रिती रिवाज
परिथळ = ताट
पायघाटे = पायात घालण्याचे अलंकार

चाचरीत = अडखाळत
चांग = चांगला
चोखो = चोखून खाणे
जातीजुती = जाईजुई
जाणवसा = जाणवसघर
जिणाणे = जिंकणे
जोहार = लवून नमस्कार
झाणी = त्याक्षणी
झाळबुके = लोंबणारी कर्ण भूषणे
झाळकळती = तेजस्वी
बौला = बोहल्यावर
बुजणे = उपभोग घेणे
मैंडलीक = सेनापती
गवादेवी = पार्वतीमंदीरात
मिठाने = भेटणे
मेघाडंबरी = दगाल, विस्तारलेली
राणीवं = देवळापुढील अंगण
लेहे = चाटून खाणे
बाधावा = बातमी
आहेर = वधुवर
सर्वभारसी = लव्याजम्यासह
सलेपण = मेव्हण्याचे नाते
सेस = मळवट
हातीयारे = हत्यारे
क्षोणीक्षणी = वेळोवेळी

पाटावू = पैठणाचे रेशमी वस्त्र
पाढ = योग्यता
पारखाणे = पारखून बघणे, धांवणे
पाहूनरु : अतिथ्य
पेरवनी = नाचणारी, नर्तकी
पेरोज - मोती
प्रातु पहारु = पहाटेची वेळ
बंबाळ = मोठा आवाज
बरवा = सुंदर
बोणे = जेवण
भांडारी = भांडाराचा मालक
भेरी = रणांगणातील वाद्य
मात = बातमी
माळोठी = वस्त्र नेसण्याची पध्दत
मुखाणी = मध्यभागी
राऊळ = देऊळ राजवाडा
लेणे = परिधान करणे
वारुवा = घोडा
विरंगंठी = बुचडा, केसांची मारलेली गाठ
संसार = प्रपंच
सांतीपाठ = शांतीपाठ
सासीनली = नटून थटून
सोनसळा = जरीकाठी
क्षीरोदक = पंचामृत किंवा उंची वस्त्र
व-हाडी = लग्नासाठी आलेले लोक

## वाक्प्रचार

१) बीजे करणे = निघुन जाणे, २) जोहारणे = वाकून नमस्कार घालणे
३) मानवणे = शरीराला पोषक होणे ४) मालीमर्दन करणे = तेल लावून चोळणे
५) मिननणे = भेटणे.

....

## संदर्भ ग्रंथ सूची


१. आद्य मराठी कवयित्री, (संपा) देशपांडे वा.ना. कॉण्टिनेंटल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९५६.

२. कविश्वर कुळाचा वृध्दाचार परंपरा आणि वाङ्मयीन संशोधनात्मक अभ्यास, मचाले, जे.टी. पीएच्.डी.चा अप्रकाशित प्रबंध.

३. गोविंदप्रभुचरित्र (संपा) कोलते वि.भि. अरुण प्रकाशन, मलकापूर.

४. गोविंदप्रभु चरित्र (संपा) कुलकर्णी व.दि. व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८०.

५. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला, देशपांडे अ.ना.

६. प्राचीन मराठी संतकवि : खंड पहिला (संपा) आजगावकर ज.र. प्रकाशक सौ. कमला भास्कर आजगावकर, मुंबई २८, १९५७.

७. भारतीय इतिहास संशोधक मंडळ, राजवाडे वि.का., द्वितीय सम्मेलन वृत्त, १८३६.

८. महानुभाव संत : जोशी वसंत स. मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती.

९. महानुभाव संशोधन : डॉ. कोलते वि.भि., अरुण प्रकाशन, मलकापूर प्रथमावृत्ती, १९६२.

१०. मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड पहिला, (संपा) तुळपुळे शं.गो., महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथमावृत्ती, १९८८.

११. मराठी वाङ्मयाचा इतिहास: डॉ. नसिराबादकर ल.रा. फडके प्रकाशन, कोल्हापूर, तिसरी आवृत्ती, १९८८.

१२. महदंबेचे धवळे, (डॉ) सौ. ढेकर सुहासिनी, आध्यात्मिक प्रकाशन, हैद्राबाद प्रथमावृत्ती, १९७७.

१३. मराठी आख्यान कविता एक अभ्यास, प्रा.डॉ. ग्रामोपाध्ये गं.ब. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती, १९७०.

१४. मराठी साहित्याचे आदिबंध, डॉ. देशमुख उषा महादेव, लोकवाङ्मयगृह प्रा.लि. मुंबई, प्रथमावृत्ती, १९८२.

१५. खालोबास्कृत सह्याद्रीवर्णन,(संपा) कोलते वि.भि. अरुण प्रकाशन, मलकापूर.

१६. लीळाचरित्र भाग २, डॉ. तुळपुळे शं.गो. सुविचार प्रकाशन मंडळ, १९६६.

१७. लीळाचरित्र भाग ३ डॉ. तुळपुळे शं.गो. सुविचार प्रकाशन मंडळ, १९६६.

१८. लीळाचरित्र उत्तरार्ध भाग ३,(संपा) डॉ. तुळपुळे शं.गो. सुविचार प्रकाशन मंडळ, १९६६.

१९. लीळाचरित्र उत्तरार्ध,(संपा) डॉ. तुळपुळे शं.गो. सुविचार प्रकाशन मंडळ, १९६६.

२०. लीळाचरित्र पूर्वार्ध भाग १ (संपा) डॉ.तुळपुळे शं.गो. सुविचार प्रकाशन मंडळ, १९६६.

२१. श्रीचक्रधार चरित्र, (संपा) कोलते वि.भि. अरुण प्रकाशन, मलकापूर.

२२. श्रीचक्रधार निरूपीत श्रीकृष्णचरित्र, गोपीराज महानुभाव.

२३. संतकवयित्री, डॉ. शेवडे इंदुमती, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती, १९८९.

२४. सूत्रपाठ :(संपा) नेणे ह.ना., तृतियावृत्ती, १९४२

२५. स्मृतीस्थळ, (संपा) देशपांडे वा.ना. कॉण्टिनेंटल प्रकाशन टिळक रोड, पुणे, २, दुसरी आवृत्ती, १९५६.

.....